**राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना २०२६-२७ च्या भाग I व भाग II अंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त बिनव्याजी कर्ज निधी संबंधित अंमलबजावणी यंत्रणांना वितरीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२६/प्रक्र २२/अर्थबळ**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई ४०० ०३२.
दिनांक :३ ऑगस्ट २०२६

**<u>वाचा</u>**- १) वित्त मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F.No.४४(१)/PF-S/२०२६-२७ (CAPEX), दि.२७.०३.२०२६

२) वित्त मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे मंजूरी पत्र क्र. F.No.४४(१)/PF-S/२०२६-२७ (CAPEX)-Maharashtra (E File No-३००७८५२४४) दि.२९/०७/२०२५

३) वित्त मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे मंजूरी पत्र क्र. F.No.४४(१)/PF-S/२०२६-२७ (CAPEX)-Maharashtra, (E File No-३००७८५२४४),दि.२९.०७.२०२६

४) वित्त मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F.No.४४(१)/PF-S/२०२६-२७ (CAPEX)-Maharashtra-SACE-३९ दि.२९.०७.२०२६

५) वित्त मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F.No.४४(१)/PF-S/२०२६-२७ (CAPEX)-Maharashtra-SACE- दि.२९.०७.२०२६

६) वित्त विभाग,शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२६/प्र.क्र.३८/अर्थबळ, दि.९.७.२०२६.

७) वित्त विभाग,शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२६/प्र.क्र.४६/अर्थबळ, दि.९.७.२०२६.

**<u>प्रस्तावना:</u>**

केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवली गुंतवणूकीसाठी विशेष सहाय्य योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून राज्यांना ५० वर्षे मुदतीचे बिनव्याजी कर्ज देण्यात येते. राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना-२०२६-२७ अंतर्गत भाग I-Untied या भागात केंद्र शासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी रु.४३१५ कोटी इतका नियतव्यय निश्चित करण्यात आला आहे. तसेच भाग II साठी रु. ६१६.०० कोटी इतका नियतव्यय निश्चित करण्यात आला आहे. या योजनेचे प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी PFMS वर केंद्र शासनास पाठविण्यात आले होते. केंद्र शासनाने दिनांक २९/०७/२०२६ च्या आदेशान्वये भाग **I** आणि भाग II च्या प्रस्तावांना मंजूरी दिली आहे आणि दिनांक २९/०७/२०२६ च्या आदेशान्वये यापैकी ६६ टक्के रकमेचा पहिला हप्ता म्हणून भाग **I** साठी रु.२८११.८२६९ कोटी आणि भाग II साठी रु.४०६.५६ कोटी इतकी रक्कम वितरीत करण्यात आली आहे.

**भाग I-Untide**

**(रु.कोटी)**

| | | |
|---|---|---|
| १ | राज्यास मंजूर नियतव्यय | ४३१५.०० |
| २ | राज्य शासनाने सादर केलेल्या प्रस्तावांची रक्कम | ४३१५.०० |
| ३ | केंद्र शासनाने मंजूर दिलेल्या प्रस्तावांची रक्कम | ४३१५.०० |
| ४ | ६६ टक्के प्रमाणे अपेक्षित पहिला हप्ता | २८४७.९० |
| ५ | (-) मागील वर्षाचा अखर्चित निधी | (-)३६.०७३१ |
| ६ | वितरीत निधी | २८११.८२६९ |

**भाग** II- **State/UT Share of Centrally Sponsored Schemes and Central Projects**

| | | |
|---|---|---|
| १ | राज्यास मंजूर नियतव्यय | ६१६.०० |
| २ | राज्य शासनाने सादर केलेल्या प्रस्तावांची रक्कम | ६१६.०० |
| ३ | केंद्र शासनाने मंजूरी दिलेल्या प्रस्तावांची रक्कम | ६१६.०० |
| ४ | ६६ टक्के प्रमाणे अपेक्षित पहिला हप्ता | ४०६.५६ |
| ५ | वितरीत निधी | ४०६.५६ |

२. केंद्र शासनाकडून सन २०२५-२६ मध्ये वितरित निधीपैकी रु.३६.०९१७ कोटी निधी विभागांकडे अखर्चित असल्यामुळे केंद्र शासनाने तेवढा निधी भाग I च्या पहिल्या हप्त्यामधून कपात केला आहे. ज्या विभागांकडे अखर्चित रक्कम आहे त्यांना ती रक्कम शासनाच्या एकत्रित निधीमध्ये जमा करण्याबाबत कळविले आहे. त्यापैकी खनिकर्म विभागाने शासनाच्या एकत्रित निधीमध्ये रक्कम जमा केली आहे. इतर विभागांकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. सदर अखर्चित रक्कम रु.३६.०७३१ कोटी ही या वर्षीच्या योजनेसाठी वापरण्यासाठी (reallocate) केंद्र शासनाने परवानगी दिली आहे. वित्त विभागाने या योजनेसाठी या वर्षी रु.९३०० कोटी इतकी अर्थसंकल्पीय रक्कम पूरक मागणीद्वारे केली आहे. त्यामुळे केंद्र शासनाने भाग **I मध्ये** वितरित केलेली रक्कम रु.२८११.८२६९ कोटी आणि गतवर्षीची अखर्चित रक्कम रुपये ३६.०७३१ कोटी अशी एकूण रक्कम रु.२८४७.९० कोटी आणि आ**णि भाग** II-मध्ये रु.४०६.५६ कोटी रक्कम विभागांना वाटप करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**-

केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना २०२६-२७ मध्ये भाग II मध्ये रु. ४०६.५६ कोटी (रु.चारशे सहा कोटी छपन्न लाख) इतकी रक्कम संबंधित अंमलबजावणी यंत्रणांना खालीलप्रमाणे वितरीत करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे-

भाग II- **State/UT Share of Centrally Sponsored Schemes and Central Projects**

| अ. क्र. | विभाग | केंद्र शासनाने मंजूर केलेल्या प्रस्तावांची रक्कम | पहिल्या हप्याचा अपेक्षित निधी | SNA खात्यात वर्ग करावयाची रक्कम रुपये | ज्या लेखाशीर्षातंर्गत मंजूर तरतूदीतुन खर्च करावयाचे तपशिलवार लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | नगर विकास विभाग-१ | ६१६.०० | ४०६.५६ | रु.४०६,५६,००,०००/ (अक्षरी रुपये चारशे सहा कोटी छप्पन्न लक्ष फक्त) | मागणी क्रमांक जी-८, ६२१७, नगर विकासासाठी कर्जे, ०१, राज्य भांडवली विकास, १९०, सार्वजनिक क्षेत्र व इतर उपक्रमांना कर्जे, (०१) केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजनेअंतर्गत ५० वर्षांसाठी बिनव्याजी कर्ज, (०१) (०३) सास्की योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या विविध योजना/कार्यक्रमांतर्गत प्रमुख शहरी आणि ग्रामीण पायाभूत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | सुविधा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी राज्याचा हिस्सा (कार्यक्रम) , ५५, कर्जे व आगाऊ रकमा, संगणक सांकेतांक क्रमांक **६२१७ १२११** |

३. केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना २०२६-२७ भाग **II** अंतर्गत सास्की योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या विविध योजना/कार्यक्रमांतर्गत प्रमुख शहरी आणि ग्रामीण पायाभूत सुविधा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी MUTP-3 मधील राज्याचा हिस्सा यासाठी केंद्र शासनाने वितरीत केलेल्या पहिल्या हप्त्यापोटी **रु.४०६,५६,००,०००/-(अक्षरी रुपये चारशे सहा कोटी छप्पन्न लक्ष फक्त**) SNA बँक खात्यात वर्ग करण्यास या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे. उपरोक्त रक्कम वरील तक्यामध्ये रकाना क्रमांक ६ येथील लेखाशीर्षाखाली सन २०२६-२७ या वर्षासाठी मंजूर तरतुदीमधून खर्ची घालण्यात याव्यात.

४. उपरोक्त निधी अधिदान व लेखा कार्यालयातून आहरित करण्यासाठी संदर्भ क्रमांक ६ येथील शासन निर्णयान्वये सहाय्यक संचालक, ऋण व हमी सनियंत्रण कक्ष, वित्त विभाग यांना आहरण व संवितरण अधिकारी तसेच सह सचिव, अर्थबळ, वित्त विभाग यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

५. आहरण व संवितरण अधिकारी यांनी प्रस्तुत शासन निर्णयाद्वारे वितरीत करण्यास मंजूरी प्राप्त रक्कम **रु.४०६.५६ कोटी (भाग II)** अधिदान व लेखा अधिकारी , मुंबई यांच्याकडून आहरित करुन दिनांक १४ मे २०२६ च्या शासन निर्णयाद्वारे बँक ऑफ महाराष्ट्र येथे उघडण्यात आलेल्या जोडपत्र-अ मध्ये नमूद केलेल्या SNA खात्यामध्ये वर्ग करण्यात यावी. याबाबतच्या खर्चमेळाची कार्यवाही ऋण व हमी सनियंत्रण कक्षाने करावी.

६. सदर निधी हा शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) यांना कर्ज म्हणून वितरीत होत असल्याने, सदर कर्जाच्या अटी व शर्ती निश्चित होणे आवश्यक आहे. याकरीता विभागाने त्यांचे स्तरावरुन यासंदर्भातील स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करणे आवश्यक राहील. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. शादिक-२०१२/ प्र.क्र.४९/ ऋण व हमी, दि.३०.१२.२०१४ मधे नमूद कार्यपध्दतीचे पालन करुन, विभागाने काढलेल्या शासन निर्णयासह आहरण व संवितरण अधिकारी (सहाय्यक संचालक, ऋण व हमी सनियंत्रण कक्ष, वित्त विभाग) यांनी देयक अधिदान व लेखा कार्यालयास सादर करण्याची कार्यवाही करावी.

७. केंद्र शासनाच्या दिनांक २७.०३.२०२६ च्या पत्रातील मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने संदर्भ क्रमांक ७ येथील शासन निर्णयान्वये केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणूकीसाठी विशेष सहाय्य योजनेंतर्गत प्राप्त होणा-या बिनव्याजी कर्जाचे राज्य शासनाच्या विविध प्रशासकीय विभागांना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार अनुसरावयाची कार्यपध्दती विशद करण्यात आली आहे. त्या सूचनांनुसार विभागाने कार्यवाही करणे बंधनकारक आहे.

८. सदरहू SNA बँक खात्यात जमा होणारा निधी हा PFMS प्रणालीद्वारे संबंधित अंमलबजावणी यंत्रणांनी त्यांच्या स्तरावर निवडलेल्या लाभार्थ्यांना केंद्रीय पद्धतीने वितरित करण्यात यावा. यासंदर्भात वित्त विभागाच्या दिनांक १४.५.२०२६ आणि दिनांक ९.७.२०२६ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनानुसार सदर मंजूर रक्कम PFMS प्रणाली द्वारे वितरित करण्याची योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

९. केंद्र शासनाकडून दुसऱ्या हप्त्याचा निधी प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधित विभागांनी वरील तक्त्यामधील रकाना क्रमांक ५ मधील रकमेच्या किमान ७५ टक्के इतक्या रकमेच्या खर्चाचे प्रमाणपत्र केंद्र शासनाच्या GFR १२B या नमुन्यात संबंधित विभागाच्या अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव यांच्या स्वाक्षरीने दिनांक ०५ सप्टेंबर २०२६ पूर्वी वित्त विभागास सादर करावे. मात्र उर्वरित सर्व निधी दिनांक ३१ मार्च २०२७ पर्यंत पूर्णपणे खर्च करणे बंधनकारक राहील याची विभागानी नोंद घ्यावी.

१०. केंद्र शासनाकडून प्राप्त निधी कोषागारातून काढून संबंधित अंतिम लाभार्थ्यांना प्रदान केल्यानंतरच तो खर्च म्हणून गृहीत धरण्यात येईल. कोषागारातून काढलेला निधी अन्य खात्यात साठवून ठेवण्याची परवानगी नाही, ही बाब लक्षात घ्यावी.

११. केंद्र शासनाकडून प्राप्त निधी खर्च करताना संबंधित प्रकल्पांवर त्याच बाबीसाठी केंद्र किंवा राज्य शासनाच्या अन्य निधीमधून किंवा राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना २०२६-२७ मध्ये अन्य भागात प्राप्त झालेल्या निधीमधून दुबार निधी प्रदान केला जाणार नाही याची सर्व विभागांनी दक्षता घेणे आवश्यक आहे. विभागाच्या सचिवांच्या स्वाक्षरीने तसे प्रमाणपत्र यापूर्वीच केंद्र शासनास सादर करण्यात आले आहे हे लक्षात घेण्यात यावे.

१२. केंद्र शासनाने मंजूर केलेले कर्ज विभागांनी संबंधित ज्या प्रकल्पांसाठी मंजूर केले आहे, त्याच प्रकल्पांवर मंजूर मर्यादेमध्ये खर्च करावे. काही अपरिहार्य परिस्थितीत यामध्ये बदल करावयाचे असल्यास, त्यासाठी केंद्र शासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे विभागांनी सुस्पष्ट कारणांसह वित्त विभागास बदलाचा प्रस्ताव सादर करावा.

१३. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या सर्व प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल विभागाच्या अभिलेखात एकत्रितरित्या उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्यासाठी विभागाने एक नोडल अधिकारी नेमून सर्व अभिलेख तसेच देयके उपलब्ध राहतील याबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे. यासंदर्भात केंद्र शासनाकडून महालेखापालांमार्फत केव्हाही लेखा परीक्षण होण्याची शक्यता आहे. त्यांना सर्व अभिलेख उपलब्ध करुन देण्याची संबंधित विभागाची जबाबदारी राहील.

१४. यानुषंगाने केंद्र शासनाच्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१५. सदरचा शासन निर्णय, वित्त विभाग/व्यय ७ कार्यासनाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४९९,दि.३.८.२०२६ अन्वये मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक क्रमांक २०२६०८०३१८५९५२५९०५ असा आहे.हा आदेश डिजीटल सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIJAY DATTATRAYA SHINDE

Digitally signed by VIJAY DATTATRAYA SHINDE
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Finance Department, 2.5.4.20=8D581EF6F28F20D8264FAA9BFBDC369F04EF3E0CA7B45B7276F2B2F4ED683D3C, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D744AB8F2AEDD786E4ACF89A52D8CB228F3424F1BBB8BB414195601BBDF9F6A5, cn=VIJAY DATTATRAYA SHINDE
Date: 2026.08.03 19:00:38 +05'30'

**(विजय शिंदे)**
**सह सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा.सभापती ,महाराष्ट्र विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय मुंबई
३. अध्यक्ष महाराष्ट्र विधानसभा,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद /विधानसभा महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. मा. उपसभापती, महाराष्ट्र विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय मुंबई
६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. सर्व सन्माननीय सदस्य विधान परिषद/ विधानसभा महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
८. मा. मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
९. मा. मुख्यमंत्री यांचे प्रमुख अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
१०. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास व सांबावि-साऊ) यांचे सचिव मंत्रालय, मुंबई
११. मा. उपमुख्यमंत्री( राज्य उत्पादन शुल्क)यांचे सचिव मंत्रालय, मुंबई

१२.  सर्व मा. मंत्री यांचे खासगी सचिव
१३. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (नवि-२),नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. महालेखापाल - महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
१५. महालेखापाल - महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर,
१६. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई,
१७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१८. कक्ष अधिकारी, वित्त विभाग (व्यय-७/ व्यय-३ /कोषा प्रशा-५/ ऋण व हमी/अर्थ-१८/प्रशा-४), मंत्रालय, मुंबई,
१९. निवड नस्ती.